दै. प्रजावाणी दि. 20/02/25

# 'फटाफट' आवाज करणाऱ्या दुचाकीस्वारांवर दंडात्मक कारवाई

प्रतिनिधी • नांदेड

दुचाकीच्या सायलेन्सरमध्ये बदल करून कर्णकर्कश आवाजात गाडी पळविणाऱ्या दुचाकीस्वारावर पोलिसांनी दंडात्मक कारवाई करून जवळपास अडीच लाखाचा दंड वसूल केला.

दुचाकीचे सायलेन्सर काढून गाड्या पळविणाऱ्या विरोधात कारवाई केली जाईल असे अनेकदा सांगून देखील काही हौशी तरुणांनी पोलिसांच्या आवाहनाला प्रतिसाद न देता कर्णकर्कश आवाज काढत दुचाकी गाड्या पळवित असल्याचे दृष्य शहरात दिसत होते. दरम्यान दोन दिवसांपासून पोलिसांनी अशी अनेक वाहने पोलीस ठाण्यात आणून कारवाई केली. शहरातील इतवारा, ग्रामीण, वजिराबाद शिवाजीनगर, भाग्यनगर, विमानतळ पोलीस स्टेशनच्या हद्दीत दोन्ही शहर वाहतूक शाखा व पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी ठिकठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली. यात कागदपत्रे नसणारे, ट्रिपलसीट जाणारे, वाहनाचे सायलेन्सर बदलून कानठाळ्या बसतील एवढ्या आवाजात दुचाकी गाडी पळविणारे अशा वाहनधारकावर कारवाईचा बडगा उचलला. सुमारे २०० च्या वर वाहनांवर कारवाई करून जवळपास अडीच लाखाची रक्कम एवढा दंड वसूल केला.



**मोहीम सुरू ठेवावी** : दोन दिवसांत सकाळपासूनच कोचिंग क्लासेस व मुख्य मार्गावर वाहनांना अडवून तपासणी केली जात होती. त्यामुळे अनेक हौशी तरुणांनी गल्लीबोळातून पसार होण्यातच धन्यता मानली. तरी देखील ते कुठे ना कुठे तरी पोलिसांच्या तावडीत सापडतच होते, अशी मोहीम नेहमीसाठी सुरु रहावी, अशी मागणी होत आहे.